# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक ०६/१२/२०२२

---

## कार्यवृत्त

आज दिनांक ०६/१२/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या नियोजन विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

विषय क्र.१:- नगर रचना अधिकारी, विकास योजना मलकापूर यांचेकडील पत्र न.प.मलकापूर/प्रा.वि.यो.मलकापूर (दु.सु.)/ससंनरबू/१८ दि. १२/१०/२०२२ नुसार प्राप्त मलकापूर शहराची प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करणेबाबत विचार विनिमय करणे.

---

**विषय क्र.१:- नगर रचना अधिकारी, विकास योजना मलकापूर यांचेकडील पत्र न.प.मलकापूर/प्रा.वि.यो.मलकापूर (दु.सु.)/ससंनरबू/१८ दि. १२/१०/२०२२ नुसार प्राप्त मलकापूर शहराची प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करणेबाबत विचार विनिमय करणे.**

नगर रचना अधिकारी, विकास योजना मलकापूर यांचेकडील पत्र न.प.मलकापूर/प्रा.वि.यो.मलकापूर (दु.सु.)/ससंनरबू/१८ दि. १२/१०/२०२२ चे पत्र प्राप्त झाले असून त्यांनी मलकापूर शहराची तयार केलेली प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करण्यासाठी नगर परिषदेस हस्तांतरित केलेली आहे. त्यानुसार याबाबतीत स्थानिक आमदार,मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्याशी झालेल्या चर्चेस अनुसरून आजच्या सभेत सविस्तर विचार विनिमय करण्यात आला.

**ठराव :**

नगर रचना अधिकारी यांनी हस्तांतरित केलेला मलकापूर शहराचा प्रारूप विकास योजना नकाशा,अहवाल आणि तदनुषंगिक कागदपत्रांचे आजच्या सभेत अवलोकन केले असता, त्यात काही बदल आवश्यक आहेत,असे मत झाले.त्यानुसार प्रारूप विकास योजनेत खालीलप्रमाणे बदल करण्याबाबत निर्णय घेण्यात आले.

१. खालील यादीनुसार मलकापूर शहरातील शासकीय तसेच न.प.च्या मालकीच्या भूखंडांवर आरक्षणे/जमीन वापर प्रस्तावित करण्यात यावा.

| अ.क्र. | सर्वे नं./शिट नं. | भूखंडाचा यापूर्वीचा वापर. | सुधारित विकास योजनेमध्ये प्रस्तावित करावयाचा वापर/आरक्षण | भूखंडाचे क्षेत्र | मालक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वे नं. २५२/२(pt) | शॉप्पिंग कॉम्प्लेक्स,गार्डन व कल्याण मंडपम (आ.क्र.२५) | शॉप्पिंग कॉम्प्लेक्स,गार्डन व कल्याण मंडपम | ०.६७ हे.आर | नगर परिषद मलकापूर |
| २ | शिट नं.२० प्लॉट नं. १०(pt) | जकात गोडाऊन | शॉप्पिंग कॉम्प्लेक्स | १३८३५ चौ.फुट | नगर परिषद मलकापूर |
| ३ | सर्वे नं. १८९ (टिपी स्कीम नं. १) प्लॉट नं. २४८ | न.प.मराठी माध्यमिक प्रा.शाळा क्र. ४ पाडून अभ्यासिकासाठी निर्माणाधीन | निर्माणाधीन अभ्यासिका क्षेत्र आणि अभ्यासिकेचे क्षेत्र वगळून नगर परिषद वापराकरिता | ०.७१ हे.आर | नगर परिषद मलकापूर |
| ४ | सर्वे नं. १८०(pt) (आ.क्र. ५० व ५४) | वाचनालय व बालक मंदिर | नगरपरिषदेच्या वापराकरिता (Municipal Purpose) | ०.१८ हे.आर | नगर परिषद मलकापूर |
| ५ | शिट नं.१४ प्लॉट नं. २९७(pt) | जुना न.प. मानवी सरकारी दवाखाना | मानवी दवाखाना क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्र शॉप्पिंग कॉम्प्लेक्स | २५४४५ चौ.फुट | नगर परिषद मलकापूर |
| ६ | सर्वे नं. २५८(pt) | आ.क्र.२२ (खुली जागा) | सांडपाणी प्रक्रिया संयंत्र | १.८१ हे.आर | नगर परिषद मलकापूर |
| ७ | शिट नं.१५ प्लॉट नं. ३७५(pt) | न.प.मराठी प्राथमिक शाळा क्र. १ | न.प.मराठी प्राथमिक शाळा व भागशः शॉप्पिंग कॉम्प्लेक्स | ... | नगर परिषद मलकापूर |

२. मलकापूर शहराची वर्तमान स्थिती लक्षात घेता विकासाचा समतोल राखण्याच्या दृष्टीकोनातून शहराचे क्षेत्रफळ कमी असल्याने 'शेती तथा तत्सम वापर क्षेत्र' कमी करणेबाबत योग्य तो बदल करण्यात आला आहे.परंतु, मलकापूर शहराच्या उत्तरेकडील भागात वास्तव्यास (रेल्वेलाईनच्या उत्तरेस वास्तव्यास ) असलेल्या लोकसंख्येस मुलभूत सोयीसुविधा देण्याकरिता मलकापूर शहराच्या उत्तरेकडील भागात आवश्यक प्रमाणात आरक्षण दर्शविणे आवश्यक होते. हस्तांतरित प्रारूप विकास योजना (दु.सु.) नकाशामध्ये सदर ठिकाणी योग्य त्या प्रमाणात बगीचा व खेळाचे मैदानाचे तसेच राष्ट्रीय महामार्ग ७५३ लगत शॉपिंग कॉम्लेक्स व वेजिटेबल मार्केटचे आरक्षण प्रस्तावित करावे.

३. मलकापूर शहरातील MSM शाळेसमोरील मंजूर रेखांकनामध्ये दर्शविण्यात आलेला नांदुरा रोड ते सर्वे क्र.१४८ची दक्षिणेकडील हद्द यांना जोडणारा विकास योजना रस्ता मुळ मंजूर नियोजनानुसार कायम ठेवणेबाबत आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी.

४. मलकापूर न.प.हद्दीतील स.नं.१४०,शिट नं. २१,प्लॉट नं.५ मधील २.५० हे.आर क्षेत्र औद्योगिक विभागातून रहिवासी विभागात समाविष्ठ करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वये कार्यवाही पूर्ण करण्यात आली होती. त्यास अनुसरून मा. अव्वर सचिव,नगर विकास विभाग,महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.टिपीएस-२६०८/१७६२/प्र.क्र.१३१/२००९ दि. २८/०५/२०१० अन्वये सदर प्रकरणी फेरबदलाची अधिसूचना निर्गमित न करता विकास योजना मलकापूर यातील औद्योगिक विभागातील वापर बंद/स्थलांतरित झाल्यास अशा क्षेत्रावर रहिवासी/वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ठ करण्याबाबत दि. २६/०८/२००९ रोजी निर्गमित कलम ३७(२) अन्वयेच्या अधिसूचनेनुसार सदर प्रकरणातील जमिनीवर आवश्यक ती कार्यवाही मलकापूर नगर परिषदेला करता

येईल,असे कळविण्यात आले होते. सबब, मोक्यावरील औद्योगिक वापर बंद असल्याने तेथे निवासी वापर दर्शविणेबाबत आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी.

५. मलकापूर शहरातील नांदुरा रोडलगत असणाऱ्या राधाकिसन पल्सेस लगतच्या काही ठिकाणी सध्यस्थितीत रहिवासी किंवा तत्सम वापर आहे, तेथील औद्योगिक वापर बंद असल्याने तो भाग निवासी क्षेत्रात दर्शविण्याकरीता आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी.

६. नगर रचना अधिकारी यांनी हस्तांतरित केलेला मलकापूर शहराच्या प्रारूप विकास योजना नकाशामधील आरक्षण क्र. २४ (मलकापूर शहराच्या जुन्या विकास आराखड्यातील आ.क्र. ४१ "गार्डन") च्या जागेबाबतीत मलकापूर नगर परिषदेस यापूर्वी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये नोटीस प्राप्त झाल्याचे या कार्यालयातील अभिलेखावरून दिसून येते. सदर नोटीसच्या अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही अद्याप झालेली नाही.हि बाब विचारात घेऊन लगतच्या भूखंडावरील वापराप्रमाणे सदर जागा निवासी वापरत दर्शविण्याबाबत आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी.

७. मलकापूर नगर परिषद हद्दीतील बुलडाणा रोडवरील गोरक्षणकरिता वापर असलेल्या क्षेत्रावर सार्वजनिक तथा निमसार्वजनिक क्षेत्र/जमीन वापर दर्शविण्यात यावे.

नगर रचना अधिकारी, विकास योजना मलकापूर तथा सहायक संचालक, नगर रचना बुलडाणा यांच्यामार्फत सदर बदल तसेच दुरुस्ती करून घेऊन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये मलकापूर शहराची प्रारूप विकास योजना (दु.सु.) प्रसिध्द करण्यास व सदर ठरावाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, नगर परिषद मलकापूर यांनी पुढील प्रशासनिक कार्यवाही करण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**